# पोहरा-मालखेडच्या जंगलात रानगवा

## पहिलीच नोंद



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.13 )** – पोहरा, मालखेड चे राखीव जंगल हे अमरावती जिल्ह्यातील मेळघाट व्याघ्र प्रकल्पानंतर सर्वात मोठे जंगल आहे. या जंगलामध्ये वाघ, बिबट, जंगली कुत्रा, तडस, लांडगे, हरीण, निलगाय अशा प्राण्यांचे नियमित अस्तित्व असते. आता यात रानगव्याचीही नोंद झाली आहे. येथे पहिल्यांदाच रानगवा आढळला आहे.

युथ फॉर नेचर कॉन्सरवेशन ही संस्था बिबट, वाघ यासारख्या प्राण्यांवर अमरावती वनविभाग सोबत संशोधन करत आहे. ज्यामध्ये ट्रॅप कॅमेरा च्या मदतीने वन्यप्राण्यांच्या हालचालीवर लक्ष्य ठेवण्यात येते. या दरम्यान अमरावती लगत असणाऱ्या वन क्षेत्रात विशिष्ट प्रकारचे खुराचे निशाण आढळले व ते रान गव्याचे असल्याची शंका असल्याने तेथे ट्रॅप कॅमेरा लावण्यात आला आहे. दुसऱ्याच दिवशी त्या कॅमेरा मध्ये रानगव्याचा फोटो आला आहे. हया जांगलामधे अश्या प्रकारची ही प्रथम नोंद असल्याचे संस्थेचे अध्यक्ष व वन्यजीव अभ्यासक डॉ. स्वप्नील सोनोने यांनी सांगितले.

### जगातील लोकसंख्येपैकी 85 टक्के भारतात

रानगवा हा गोवंश कुलातील सगळ्यात मोठा प्राणी आहे व हा शाकाहारी असुन त्यांच्या सध्याच्या जगातील लोकसंख्येपैकी 85 टक्के भारतात आहेत. वन्यजीव संरक्षण कायदा, 1972 अंतर्गत शेड्यूल 1 प्रजाती म्हणून सूचीबद्ध आहे. इंटरनॅशनल युनियन फॉर कॉन्झर्व्हेशन ऑफ नेचरच्या (द्बुष्टह्) रेड लिस्टमध्ये असुरक्षित (Vulnerable) म्हणून घोषित केले आहेत, अशी माहिती डॉ. स्वप्नील सोनोने यांनी दिली. मुख्य वनसंरक्षक (अमरावती) जयोती बॅनर्जी, उपवनसंरक्षक धैर्यशील पाटील, सहाय्यक वनसंरक्षक देसाई, वनपरिक्षेत्र अधिकारी हरणे, पवार , वनविभागाचे कर्मचारी व युथ फॉर नेचर कॉन्सरवेशन ची टीम या प्राण्याच्या संवर्धनासाठी सोबत काम करत आहे.

### 100 चौ. किमीमध्ये पसरलेले जंगल

अमरावती प्रादेशिक वन विभागांतर्गत येणारे हे जंगल 100 चौ. किमी पेक्षा जास्त क्षेत्रा मध्ये पसरलेले असून येथे 275 पेक्षा जास्त पक्ष्यांची नोंद आहे. यामध्ये स्थानिक व स्थलांतर करुन येणाऱ्या पक्ष्यांचा समावेश आहे, तसेच विविध फुलपाखराच्या व कीटकांच्या प्रजातीची नोंद आहे. रानगव्याच्या अस्तित्वाने या जंगलाची समृद्धी अधोरेखित होते, असे उपवनसंरक्षक धैर्यशील पाटील यानी सांगितले.

# त्या आत्महत्येप्रकरणी पतीसह तिघांविरुद्ध गुन्हा



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.13 )** – एका 27 वर्षीय विवाहितेने अपार्टमेंटच्या चौथ्या माळ्यावरील फ्लॅटच्या गॅलरीतून उडी घेऊन आत्महत्या केली होती. ही घटना 9 डिसेंबर रोजी पहाटे 3 ते 4 च्या दरम्यान घडली होती. याप्रकरणी मृत विवाहितेच्या पित्याच्या तक्रारीवरून खोलापुरी गेट पोलिसांनी 11 डिसेंबर रोजी रात्री 11:30 च्या सुमारास मृताच्या पतीसह सासरा व एका महिलेविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा गुन्हा दाखल केला आहे.

आरती (27, रा. पार्वतीनगर) असे मृत विवाहितेचे नाव आहे. मृताचा पती ऋषिकेश प्रमोद चौधरी (30), प्रमोद पुंडलिकराव चौधरी (55) व एक महिला (सर्व रा. बल्लाळेश्वर अपार्टमेंट, पार्वतीनगर नंबर 2) यांचा गुन्हा दाखल झालेल्यांमध्ये समावेश आहे. आरती या पती व कुटुंबासह पार्वतीनगर येथील अपार्टमेंटमध्ये चौथ्या माळ्यावर राहत होत्या. रविवारी मध्यरात्रीनंतर त्यांनी आपल्या फ्लॅटच्या गॅलरीतून उडी घेतली. त्या थेट खाली उभ्या असलेल्या चारचाकी वाहनांवर कोसळल्या. त्यामुळे मोठा आवाज झाला. हा प्रकार आरती यांच्या पतीच्या लक्षात आल्यावर त्यांनी अपार्टमेंटमधील रहिवाशांच्या मदतीने त्यांना तातडीने एका खासगी रुग्णालयात दाखल केले. परंतु सोमवारी दुपारी उपचारादरम्यान आरती यांचा मृत्यू झाला. याबाबत माहिती मिळाल्यावर खोलापुरी गेट पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला. याप्रकरणी मृत आरती यांच्या पतीच्या तक्रारीवरून पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली होती. मात्र त्यानंतर मृताचे वडील शंकर काळे (59, रा. मारूड, ता. जि. पांढुर्णा) यांनी खोलापुरी गेट पोलिस ठाणे गाठून तक्रार नोंदविली.

### काय आहे तक्रारीत ?

एफआयआरनुसार, आरती यांचे मे 2023 मध्ये ऋषिकेशशी लग्न झाले होते. लग्नाच्या दोन महिन्यांनी ऋषिकेश हा दारू पिऊन घरी येऊ लागला. तो तिला मारहाणदेखील करत होता. वडिलांनी हुंडा दिला नाही, असे म्हणून तो शारीरिक व मानसिक त्रास देत होता. मुलीला त्रास होऊ नये म्हणून शंकर काळे यांनी आरोपींना दीड लाख रुपये दिले. मात्र त्यानंतरदेखील त्यांनी मुलीला त्रास देणे सुरूच ठेवले होते. सासू, सासरेदेखील हुंड्यासाठी टोमणे मारत होते. त्या त्रासाला कंटाळून आपल्या मुलीने चौथ्या माळ्यावरून उडी मारली व ती उपचारादरम्यान मरण पावली, असे काळे यांनी तक्रारीत म्हटले आहे.

# चेक बाऊन्स प्रकरणी एक वर्षाचा कारावास



**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर, ( दि.13 )** – धनादेश अनादर प्रकरणात दर्यापूरचे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी ए.आर.यादव यांच्या न्यायालयाने आरोपी अभिजित गणेशराव चोरे याला एक वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा सुनावली असून दीड लाख रुपये धनादेशाच्या दुप्पट म्हणजे 3 लाख रू. आणि दंड भरण्याचा आदेश दिला आहेत. तसेच दंड न भरल्यास दोन महिने अतिरिक्त कारावासाची शिक्षा सुनावली.

प्राप्त माहितीनुसार, नागपूर येथील वृषाली नत्थू खेरडे आणि अंजनगाव सुर्जी येथील अभिजित चोरे हे एकमेकांच्या परिचयाचे असून, आरोपीने वृषाली खेरडे यांच्याकडे दीड लाख रुपये उसने मागितले होते. वृषालीने त्याला दीड लाख रुपये उसने दिले होते. उधार घेतलेले पैसे परत करण्यासाठी आरोपी अभिजीतने वृषालीला खामगाव अर्बन को-ऑप. बँक लि. अंजनगाव सुर्जी शाखेचा धनादेश दिला. हा धनादेश न वटल्याने वृषाली खेरडे यांनी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी ए. आर. यादव यांच्या न्यायालयात ॲड. आशिष बावनेर यांच्यामार्फत अभिजित चोरे याच्याविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणी दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर न्यायालयाने आरोपी अभिजित चोरे याला दोषी ठरवून एक वर्ष सक्तमजुरी व तीन लाख रुपये दंड अन्यथा दोन महिने अतिरिक्त कारावासाची शिक्षा सुनावली आहे.

# ओलीत करण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याचा शॉक लागून मृत्यू

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, ( दि.13 )** – गहू पिकाला ओलीत करण्यासाठी गेलेल्या एका 50 वर्षीय शेतकऱ्याचा विद्युत शॉक लागून मृत्यू झाल्याची घटना आज दि.13 डिसेंबर रोजी सकाळी 9 वाजताचे सुमारास घडली.

मृतक इसमाचे नाव अन्नू बिरज भादे (वय 50 वर्षे रा.पिंपरी) असे आहे. पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार आदिवासी बहुल खेडे असलेल्या पिंपरी येथील अन्नू बिरज भादे या शेतकऱ्याने आपल्या पिंपरी शेत शिवारात गहू पिकाची लागवड केली. दि.13 डिसेंबर रोजी शेतात गव्हाच्या पिकाला पाणी देण्यासाठी ते गेले होते व पाणी मोटारचे स्टार्टर सुरू करून गव्हाला पाणी ओलीत सुरू असतांना अचानक मोटर बंद पडल्यामुळे मोटरला काय झाले म्हणून बघण्यासाठी गेले असता स्टार्टरची वायर त्यांना निघालेल्या अवस्थेत दिसली. ती दुरुस्त करतेवेळी मीटर पेटीतील स्टार्टरच्या जीवंत वीज प्रवाह असलेल्या वायरला हात लागल्याने अन्नू भादे यांचा जागीच मृत्यू झाला. बऱ्याच वेळानंतरही ते घरी न परतल्याने त्यांचा मुलगा त्यांना पाहण्यास शेतात गेला असता वडील जागेवर मृत अवस्थेत पडलेले दिसले. मुलाने गावकऱ्यांना माहिती दिल्यानंतर पोलीस पाटलाच्या वतीने मोर्शी पोलीस स्टेशन ला कळविण्यात आले. पोलिसांनी घटनास्थळी पोहोचत पंचनामा केला. त्यांनतर उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात दिला.पुढील तपास मोर्शी पोलीस करीत आहे.



# भरधाव इंडिका कारची उभ्या ट्रकला धडक ; 3 गंभीर

**मोर्शी चांदूरबाजार मार्गावरील खेड फाट्याजवळची घटना**

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.13 )** – चांदूरबाजार वरून मोर्शी कडे जाणाऱ्या भरधाव इंडीका कारने रेल्वे गेट जवळ उभ्या असलेल्या ट्रकला धडक दिली. या अपघातात तीन जण गंभीर जखमी झाल्याची घटना गुरुवारी (ता.12) रात्री 9.30 वाजताच्या दरम्यान घडली.

नरखेड कडे जाणारी काचीगुडा एक्सप्रेस रात्रीला येत असल्याने तालुक्यातील खेड फाटा नजीक असलेले रेल्वे गेट बंद करण्यात आले होते. त्यामुळे चांदूरबाजार कडून मोर्शी कडे जात असलेला एम एच 27 एक्स 45 85 क्रमांकांचा ट्रक उभा होता. दरम्यान मागून भरधाव येणार्या एम एच 31 सीए 3729 क्रमांकांच्या कारने मागून उभ्या असलेल्या ट्रकला धडक दिली. यामध्ये कारमध्ये प्रवास करीत असलेले दोन युवक व दोन युवती जखमी झाले. त्यापैकी तीन जण गंभीर जखमी झाले आहेत. तर एक जण किरकोळ जखमी आहे. घटनेची माहिती उदखेड येथील काही नागरिकांना मिळताच त्यांनी लगेच घटनास्थळावर धाव घेऊन जखमींना मोर्शी येथील उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तीन जखमीची परिस्थिती गंभीर असल्याने तेथील डॉक्टरांनी जखमींना जिल्हा रुग्णालय अमरावती येथे पुढील उपचारासाठी पाठविण्यात आले. पोलिस विभागातर्फे पुढील तपास सुरू आहे.

# जि.प.सिईओंनी केली जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी

## बेनोडा सरपंच रजनी कुबडे यांनी केले संजिता मोहपात्रा यांचे स्वागत



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.13 )** – पंचायत समिती अंतर्गत बेनोडा शहीद येथे मागील काही महिन्यापासून जलशुद्धीकरण केंद्राचे काम सुरू होते, जे आता पूर्णत्वास गेले आहे. त्याची पाहणी करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता मोहपात्रा यांनी गुरुवार (दि.12) ला बेनोडा शहीद येथे येऊन जलशुद्धीकरण केंद्राची पाहणी केली. यावेळी ग्रामपंचायतच्या सरपंच रजनी कुबडे यांनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.

मागील काही वर्षापासून बेनोडा शहीद येते शुद्ध पाणीपुरवठा व्हावा यासाठी गावातील काही नागरिकांनी शासनाकडे तसेच प्रशासनाकडे वेळोवेळी पाठपुरावा केला होता, काही वेळा या पाठपुराव्याला अपयश जरी आले असले तरी मात्र सततच्या प्रयत्नाने आज मात्र यश आले आहे. या गावातील नागरिकांना शुद्ध पाण्याचा पुरवठा व्हावा यासाठी या गावांमध्ये जलशुद्धीकरण केंद्राचे काम पूर्णत्वास आले आहे. त्यातून गावाला शुद्ध पाण्याचा पुरवठा सुरू झाला आहे. जिल्हा परिषदच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा यांनी नुकतीच भेट देत केंद्राची पाहणी केली. त्यांनी जलशुद्धीकरण केंद्राच्या कामाविषयी व गावकऱ्यांना शुद्ध पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सुरू झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले आहे. यावेळी ग्रामपंचायतच्या सरपंच रजनी कुबडे, उपसरपंच उत्तम पटोडे, ग्रामपंचायतचे माजी उपसरपंच गोपाल नांदुरकर, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सतीश देशमुख व ग्रामपंचायती मधील सदस्य व ग्रामविकास अधिकारी यांनी गावात सुरू असलेले जलशुद्धीकरण केंद्र पूर्ण करण्यासाठी मोलाचे सहकार्य केले. असे सरपंच रचनी कुबडे यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

# त्या प्रकरणात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा

**अमरावती** – पत्नी व मुलासह दुचाकीने अंजनगाव बारी गावाकडे जात असलेल्या दुचाकीस्वाराच्या गळ्यात नॉयलॉन मांजा अडकून त्याचा मृत्यू झाला होता. 14 जून रोजी दुपारी 12:30 च्या सुमारास अकोला-नागपूर महामार्गावरील वरुडा येथील ओव्हरब्रिजवर ती हृदयद्रावक घटना घडली होती. त्याप्रकरणी मृताच्या पत्नीच्या तक्रारीवरून बडनेरा पोलिसांनी सहा महिन्यांनंतर 11 डिसेंबर रोजी सायंकाळी अज्ञाताविरुद्ध सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला. शुभम रामेश्वर बिल्लेवार (28, रा. कृषीनगर, अकोला) असे मृताचे नाव आहे.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अनागोंदी कारभाराविरुद्ध शिवसेना आक्रमक




**उग्र आंदोलन छेडण्याचा इशारा**

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.13 )** – महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या (मजिप्रा) अनागोंदी कारभारामूळे जनसामान्य नागरिक त्रस्त आहे. शहरात मोठ्या प्रमाणात अवैध नळ कनेक्शन तरीही मजिप्रा प्रकाराकडे दुर्लक्ष करित आहे, आणि जनसामान्यांना अव्वाचे सव्वा पाणी बिल देत आहे. याविरुध्द आक्रमक शिवसेनेने(शिंदे गट) मजिप्रा विरुध्द उग्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे.

शुक्रवार (दि.13) शिवसेनेचे शहरप्रमुख आशिष ठाकरे यांच्या नेतृत्वात नागरिकांनी मजिप्राच्या अधिकाऱ्यांना तक्रारीचे निवेदन सादर केले. ज्यामध्ये ग्राहकांना वेळेवर बिले देण्यात येत नाही, मीटर रीडर वेळेवर मीटर रिडींग न घेताच लॉकबिल/फॉल्टी मीटर दाखवून स्वत:च मनाने एव्हरेज बिले देतात. यासर्व बाबींमुळे ग्राहकांना नाहक आधीभार भरावा लागतो व शारीरिक, मानसिक त्रास सहन करत आपल्या कार्यालयाचे उंबरठे झीजवावे लागतात. विहित मुदतीत जर बिले ग्राहकांना अदा केल्या गेली,तर ग्राहक ती बिले भरण्यासाठी त्याची सोय आधीच लावून ठेवतो आणि अपुरा वेळ मिळाला तर गोर गरीब मध्यमवर्गीय पेन्शनधारक चाकरमानी कसे काय वेळेवर बिल भरणार, असा सवाल करण्यात आला. यामुळेच थकबाकीदारांची संख्या वाढत जात आहे आणि आधीभारसुध्दा. तसेच नळाच्या पाण्याची चोरी करणारे, नळावर मशीन लावून पाणी ओढणारे, राजरोसपणे सर्रास अनधिकृत नळकनेक्शन घेणाऱ्यांवर कोणतीच कारवाई होतांना वा पोलिसात तक्रार होतांना दिसत नाही. गरीब जनतेला मात्र त्रास दिल्या जातो. तक्रारकर्त्या ग्राहकाला अधिकारी भेटत नाही.

वेळेवर कोणताच अधिकारी उपलब्ध राहत नाही. या ग्राहकांनी जायचे ते कोठे या सर्व बाबींकडे प्रशासनाचे लक्ष असणे गरजेचे आहे. मांडव्या सारख्या ठिकाणी सर्रास रोड फोडून अनधिकृत नळकनेक्श घेतली असतांना त्यांचेवर कारवाई होत नाही. याउलट जो रेगुलर बिल भरतो त्यांनाच त्रास होतो. अमृत योजनेमध्ये जवाहर नगर व इतर नविन वस्त्यांमध्ये नविन कनेक्शन टाकण्यात आले, परंतू अनेकांच्या अजूनही जुने कनेक्शन मीटरविना सुरु आहे. ही लोक नव्या कनेक्शनऐवजी जुन्याच कनेक्शनचा वापर करुन पाणी चोरी करित आहेत. ही बाब सुधारल्या गेली पाहिजे. धनधांडग्या च्या थकीत बिलाकडे दुर्लक्ष आणि गरीबाच्या थोडक्या बिलासाठी त्याचे नळ कनेक्शन तोडल्या जात आहे. वेळेवर बिले दिल्या जात नाही, मिटर रिडींग न घेताचं आपल्याच मनाने बिले देणाऱ्या कंत्राटदारावर त्याचे कंत्राट रद्द करून कार्यवाही करावी. अशी मागणी करत संबधित तक्रारीची दखल न घेतल्यास शिवसेना जनतेला सोबत घेऊन उग्र आंदोलन छेडल्या शिवाय राहणार नाही, असा इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी आशिष ठाकरे शिवसेना शहरप्रमुख अमरावती यांच्या समवेत सर्वश्री डॉ.तारकेश्वर घोटेकार, सुरेशराव गडवाल, भाष्करराव फोफारे, मोहनलालजी शर्मा, वामनराव वानखडे, सुभाषराव बांगडे, मुकुंद जोशी, विलासराव रघुवंशी, राजनारायण राईकवार, संजय चौधरी, आशिष पाटील इत्यादी बहुसंख्येने परिसरातील नागरिक व पदाधिकारी उपस्थित होते.

# 401 तास गाणे म्हणण्याचा होणार विश्व रेकॉर्ड

## स्वराध्या एंटरटेनमेंट व मनीष पाटील फाउंडेशनचे आयोजन

### इतिहास रचवायला अंबानगरी सज्ज

### 4 ते 21 जानेवारी कलाकारांना पर्वणी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.13 )** – अंबानगरीमध्ये ऐतिहासीक विश्वरेकॉर्ड बनविण्याकरिता सज्ज झाली आहे. स्वराध्या एंटरटेनमेंट व मनीष पाटील फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने येथे 401 तास गाणे म्हणण्याचा विश्व रेकॉर्ड रचला जाणार आहे. 4 ते 21 जानेवारी पर्यंत ही कलाकारांकरिता पर्वणी राहणार आहे. येथील शेगाव नाका स्थित अभियंता भवन येथे या विश्वरेकॉर्ड चे आयोजन करण्यात आले आहे.




### जनजागृती अभियान राबविणार

या रेकॉर्ड च्या माध्यमातून कॅन्सर, निराधार महिला, वृद्ध, अनाथ, देहदान, नेत्रदान, झाडे लावा झाडे जगवा आदी जनजागृती अभियान राबविले जाणार आहे. यामध्ये कला सादर करण्याकरिता रेकॉर्ड मध्ये नोंदणी करायची 20 नोव्हेंबर ते 20 डिसेंबर 2024 देण्यात आली आहे. विश्व विक्रम झाल्यानंतर 15 दिवसांनी सहभागी कलाकारांना सर्टिफिकेट व मेडल पण प्रदाण करण्यात येतील.

### कलाकारांना सहभाग घेण्याची संधी

सलग 18 दिवस चालणाऱ्या या विश्वरेकॉर्ड मध्ये इतर कलाकारांनाही सहभागी होण्याची संधी आहे. आपल्यामधे कोणतीही कला असेल तर हा मंच आपल्यासाठी उपलब्ध आहे. प्रत्येक इव्हेंट्स साठी 10 ते 15 मिनिटे वेळ आहे, ड्रामा असेल तर 20 मिनिटे वेळ देण्यात येईल. तसेच भजन, अभंग, कीर्तन, ड्रामा डान्स, वादन, फॅशन शो, रांगोळी, पेंटिंग, कोणतीही कला असो 15 मिनिटांत आपली कला सादर करुन दाखवायची आहे व होणाऱ्या रेकॉर्ड चे आपण साक्षीदार व्हायचं आहे.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# जिल्ह्यातील 600 महिलांना मिळणार गुलाबी ई रिक्षा

## गरजू महिलांना संधी : राज्य शासनाकडून 20 टक्के अनुदान

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.13 )-** महिला व बालविकास विभागातर्फे शहर आणि ग्रामीण भागातील गरजू महिलांना अनुदानावर पिंक ई रिक्षा देण्यात येणार आहे. या योजनेत राज्य शासनाकडून 20 टक्के अनुदान मिळणार आहे. जिल्ह्यातील 600 महिलांना रिक्षा खरेदीसाठी अर्थसहाय करण्यात येणार आहे. यासाठी इच्छुक महिलांनी अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.



पिंक ई-रिक्षा योजनेतून महिला व मुलींच्या रोजगार निर्मितीस चालना देणे, त्यांचे आर्थिक, सामाजिक पुर्नवसन करणे, स्वावलंबी, आत्मनिर्भर करणे, स्त्री सशक्तीकरणास चालना देणे, महिला व मुलींना सुरक्षित प्रवास करण्यासाठी नोकरी, तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्यासाठी इच्छुक महिलांना रिक्षा खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य व चालविण्यासाठी इतर सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. कायनेटिक कंपनीच्या माध्यमातून महिलाना परवाना, परमिट, बॅच बिल्ला, प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात येणार आहे. योजनेत ई-रिक्षाची किंमतीमध्ये जीएसटी, रजिस्ट्रेशन, रोड टॅक्स आदी करांचा समावेश राहणार आहे. नागरी सहकारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, राष्ट्रीयकृत बँका, अनुज्ञेय असलेल्या खासगी बँकाकडून ई-रिक्षा किंमतीच्या 70 टक्के कर्ज उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. राज्य शासन 20 टक्के आर्थिक भार उचलेल, योजनेची लाभार्थी महिला-मुली यांना 10 टक्के स्वहिस्सा भरावा लागणार आहे. कर्जाची परतफेड करण्यासाठी 5 वर्षे मुदत राहणार आहे.

### अशी आहे अट

लाभार्थीचे कुटुंब महाराष्ट्रातील रहिवासी असणे आवश्यक आहे. अर्जदाराचे वय 20 ते 40 वर्षे असावे. योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करणाऱ्या लाभार्थ्यांचे बँक खाते असणे आवश्यक आहे. लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न 3 लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. विधवा, कायद्याने घटस्फोटित, राज्यगृहामधील इच्छुक प्रवेशित, अनाथ प्रमाणपत्रप्राप्त युवती, अनुरक्षणगृह बालगृहातील आजी-माजी प्रवेशितांना प्राधान्य देण्यात येणार आहे. दारिद्र्य रेषेखालील महिलांनाही प्राधान्य देण्यात येणार आहे. योजनेचा लाभ एकदाच घेता येणार आहे, शासनाच्या इतर योजनांचा लाभ घेतलेला नसावा, महिला कर्ज घेण्यास पात्र असावी, परतफेडची जबाबदारी महिलेची राहणार आहे.

### या कागदपत्रांची आवश्यकता

लाभार्थींना योजनेसाठी अर्ज, आधारकार्ड, पॅन कार्ड, अधिवास प्रमाणपत्र, कुटुंबप्रमुखाचा तीन लाखापेक्षा कमी उत्पन्न असलेला वार्षिक उत्पन्नाचा दाखला, मतदान कार्ड, केशरी किंवा पिवळे रेशन कार्ड, बँक पासबुक, पासपोर्ट फोटो, मतदान ओळखपत्र, राशन कार्ड, महिला स्वत: रिक्षा चालवण्याचे हमीपत्र, महिलेचे बँक कर्ज नसल्याचे हमीपत्र, अटी व शर्ती पालन करण्याचे हमीपत्र द्यावे लागणार आहे.

### येथे करता येईल अर्ज

योजनेसाठी महिला व बाल विकास भवन, कॅम्प रोड, अमरावती, समाज विकास अधिकारी महानगरपालिका, अमरावती, कार्यक्रम व्यवस्थापक, नरेगा, जिल्हा परिषद अमरावती, बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालय, नागरी, अमरावती, बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालय, ग्रामीण, गटविकास अधिकारी कार्यालय, मुख्याधिकारी, नगरपालिका, नगर पंचायत, लोक संचालित समूह साधन केंद्र, सखी वन स्टॉप सेंटर, जिल्हा स्त्री रुग्णालय परिसर, अमरावती याठिकाणी अर्ज करता येणार आहे.

# रोषणाईने उजाळले श्री दत्त मंदिर



**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर, ( दि.13 )-** दत्त जयंती निमीत्त येथील डॉ.पंजाबराव देशमुख कॉलनी मधील श्री.दत्त मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली. शनिवार( दि.14 ) रोजी होत असलेल्या दत्त जयंती निमीत्त विविध कार्यक्रमाचे आयोजन येथे करण्यात आले आहे.

मंदिरात दर पौर्णिमेला महापुजेचे आयोजन केले जाते. सकाळ संध्याकाळी आरती केली जाते. भाविक आरतीसाठी व पूजेसाठी उपस्थित असतात, दि. 14 डिसेंबर रोजी सकाळी अभिषेक, आरती व महाप्रसाद वाटप केले जाणार आहे. भविकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. अखिल भारतीय देव दत्त मंडळ कार्यक्रमाला यशस्वी करण्याकरिता सज्ज झाले आहे.

# शिष्यवृत्ती अर्ज तत्काळ सादर करण्याचे आवाहन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.13 )-** विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती फ्रीशिप योजनेंतर्गत प्रलंबित अर्ज निकाली काढण्यासाठी महाविद्यालयांनी अर्ज तातडीने सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. सन 2011-12 ते 2016-17 कालावधीतील महाईस्कॉल प्रणालीवरील नोंदणीकृत प्रलंबित, तसेच सन 2017-18 वर्षातील ऑफलाईन पद्धतीने स्विकारण्यात आलेल्या अर्जांचा समावेश आहे. अद्यापही महाविद्यालयांनी संबंधित प्रस्ताव इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयास सादर केले नाहीत, अशा महाविद्यालयांना कागदपत्रांसह अर्ज दि. 24 डिसेंबर 2024 पर्यंत सादर करावे लागणार आहे. यात विलंब झाल्यास प्रस्ताव शासनास सादर करता येणार नाही. त्यामुळे विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास याची जबाबदारी प्राचार्यांवर राहणार आहे, असे इतर मागास बहुजन कल्याणच्या सहायक संचालक सरीता बोबडे यांनी कळविले आहे.

# खण्डेला धाम रथयात्रेचे शहरात जंगी स्वागत

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.13 ) -** खंण्डेला धाम, राजस्थान येथून भारत भ्रमंतीसाठी निघालेली रथयात्रा मंगळवारला सकाळचे सुमारास संत्रानगरी वरुड शहरातील केदार चौक परीसरात पोहचताच फटाक्यांची आतिषबाजी व पुष्प वर्षा करून खंडेलवाल समाज बांधवांनी जंगी स्वागत करीत नागरिकांचे लक्ष वेधले.





संपूर्ण भारतभर पसरलेल्या खंडेलवाल समाजात खण्डेला धाम संदर्भात जनजागृती करण्यासाठी ही रथयात्रा भारत भ्रमण करीत आहे. खंडेलवाल वैश्य समाजाचे उगम स्थान असलेल्या खण्डेला जि. सीकर (राजस्थान) मध्ये बनलेल्या खंडेलवाल वैश्य समाजाच्या तिर्थक्षेत्र येथुन भारत भ्रमण करीता निघालेली खण्डेला धाम भारत जागरण रथ यात्रा गुजरात राज्यानंतर महाराष्ट्रात प्रवेश करून सहाडा, नंदुरबार, धुळे, सिल्लोड, खामगाव, सोनाला, अकोला, अमरावती मार्गे 10 डिसेंबर रोज मंगळवारला संत्रानगरी वरूड शहरात दाखल झाली. यावेळी फटाक्यांची आतिषबाजी व पुष्प वर्षा करीत खंडेलवाल समाजात खण्डेला धाम प्रती जनजागृती करण्याकरीता भारत भ्रमण करीत असलेले मॅनेजिंग ट्रस्टी पुरुषोत्तम गुप्ता व श्रीमती हंसा गुप्ता यांचे जंगी स्वागत करण्यात आले. या खण्डेला धाम भारत जागरण यात्रेचा रथ महाराष्ट्रातील मोजक्याच शहरातुन मार्ग भ्रमण करीत असतांना वरूड, पुसला आणि शेंदुरजनाघाट येथील सर्वच खंडेलवाल समाज बांधवांनी 10 डिसेंबर रोज मंगळवारला सकाळी 10 वाजता सहपरिवार शहरातील केदारचौक परीसरात एकत्रीत झाले. येथे खंडेलवाल ज्वेलर्स येथे चहा पाणी करून शहरातील मुख्य मार्गाने या रथ यात्रेची सुरुवात करण्यात आली. यावेळी सर्व महिला चुनरीची साडी परिधान करीत तर सर्व पुरुष पिवळे वस्त्र परिधान करीत या रथ यात्रेत सहभागी झाले होते. मार्ग भ्रमण करीत असतांना महिलाचे गरबा न्युत्य, मातेचा जयकारा, रथ यात्रेवर केल्या जात असलेला पुष्प वर्षाव महिला पुरुषांच्या हातातील झेंडे, पताका नागरीकांचे लक्ष वेधून घेणारे होते. हि रथ यात्रा मार्ग भ्रमण करीत इंदिराचौक परीसरातील गायत्री मंदीरात पोहचली तेथे रथातील मातेचे विधीवत पुजन, आरती करून पुरुषोत्तम गुप्ता यांनी उपस्थित समाज बांधवांना खण्डेला धाम बाबत माहीती देत आयोजन समिती सदस्यांचे आभार मानले. स्वरूची भोजनाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता वरूड तालुका खंडेलवाल सेवा समितीच्या सर्व सदस्यांनी अथक परिश्रम घेतले.

# नायलॉन मांज्यावर कायमस्वरुपी बंदी

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.13 )-** प्लॅस्टिक किंवा इतर कृत्रिम वस्तूपासून बनविलेल्या नायलॉन मांजा या पक्क्या धाग्याचा वापर पतंग उडविण्यासाठी होतो. या धाग्यामुळे पक्षी, तसेच मानवी जिवितास तीव्र इजा होण्याचा धोका असतो. त्यामुळे अशा धाग्यांचा वापर, तसेच इतरवेळी नायलॉन मांज्याची धाग्यांची निर्मिती, विक्री, साठवणूक व वापर करण्यास कायमस्वरुपी बंदी घालण्यात आली आहे.



संपूर्ण जिल्ह्यातील घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी, तसेच साठवणूकदारांना नायलॉन मांजाची विक्री, साठवणूक करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. पतंग उडविण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या अशा अविघटनशील नायलॉन मांजामुळे गुरांना उद्भवणारा धोका, माती व पाण्याच्या गुणवत्तेची पातळी घसरणे, तसेच एकंदरीत परिस्थितीत प्राणीजातीला उद्भवत असल्याने प्रतिबंध घालण्यात आले आहे.

पतंग उडविताना केलेल्या नायलॉन मांजाच्या वापरामुळे विजेच्या तारांवर घर्षण होऊन आग लागणे, उपकेंद्रे बंद पडणे, वीज उपकरणे बिघडणे, अपघात घडणे, इजा व जीवित हाणी होणे याबाबतची जनजागृती स्थानिक स्वराज्य संस्था आणि पोलिस विभागाने करावी, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. सदर आदेशाचे उल्लंघन केल्यास भारतीय न्याय संहितेच्या कलम 223 प्रमाणे कारवाई करण्यात येणार आहे. सदर आदेश 31 जानेवारीपर्यत लागू राहणार आहे, असे जिल्हादंडाधिकारी सूरज वाघमारे कळविले आहे.

# अंबाडा येथे विद्यालयीन विद्यार्थ्यांना कायद्याचे मार्गदर्शन

## मोर्शी पोलीस स्टेशनच्या दामिनी पथकाचा उपक्रम



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.13 ) –** ग्रामविकास माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय अंबाडा येथे मोर्शी पोलीस स्टेशन अंतर्गत दामिनी पथकाद्वारे विद्यार्थ्यांना कायद्याचे मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी मोर्शी पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक हेमलता वाघ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विशेषत: शाळेतील मुलींना त्यांच्या सुरक्षिततेबद्दल विशेष माहिती दिली. याप्रसंगी विद्यालयाचे प्राचार्य अविनाश साळकर तसेच विद्यालयाचे पर्यवेक्षक अविनाश फुटाणे, ज्येष्ठ शिक्षक राजेंद्र गेडाम, सुनील खोडस्कर, प्रशांत लोखंडे, छाया वानखडे तसेच अंबाडा गावचे पोलीस पाटील सुनील चव्हाण उपस्थित होते.



कार्यक्रमाचे संचलन विद्यालयाचे शिक्षक हर्षल आमले यांनी केले. त्याकरिता शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# कृषी निविष्ठा विक्रेत्यांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन

## 31 डिसेंबरपर्यंत अर्ज करण्यासाठी मुदत

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.13 ) –** जिल्ह्यातील कृषी निविष्ठा विक्रेत्यांसाठी डेसी (डिप्लोमा इन ॲग्रीकल्चर एक्सटेंशन सर्व्हीसेस फॉर इनपूट डिलर्स) हा एक वर्ष कालावधीच्या प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी इच्छुकांना दि. 31 डिसेंबरपर्यंत अर्ज करता येणार आहे.

सदर प्रशिक्षण प्राचार्य, प्रादेशिक कृषी विस्तार व्यवस्थापन प्रशिक्षण संस्था, रामेती, अमरावतीमार्फत चालविण्यात येणार आहे. प्रवेशासाठी पात्रता कमीत कमी दहावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. इच्छुकांना दहावी किंवा बारावी पासचे प्रमाणपत्र आणि गुणपत्रिका, आधार कार्ड, चार पासपोर्ट आकाराचे छायाचित्रे, कृषी निविष्ठा विक्रीचा परवाना असल्यास परवान्याची छायांकित प्रत आदी कागदपत्रे प्रवेशासाठी आवश्यक आहेत. प्रशिक्षण वर्गासाठी नव्याने परवाना काढू इच्छिणाऱ्या प्रवेश पात्र उमेदवारासाठी प्रवेश शुल्क 20 हजार रुपये आहे. तसेच कृषी निविष्ठा परवाना असलेल्या प्रवेश पात्र विक्रेत्यांसाठी प्रवेश शुल्क 10 हजार रूपये राहणार आहे. प्रवेश अर्जासाठी प्रकल्प संचालक, आत्मा कार्यालय, विसावा कॉलनी, जुना बायपास रोड, अमरावती येथे संपर्क करावा. उमेदवारांनी दोन प्रतीत अर्ज सादर करणे आवश्यक आहे. तसेच प्रवेश अर्ज www.manage.gov.in या वेबसाईटवरही उपलब्ध आहे.

नव्याने कृषी निविष्ठा परवाना काढु इच्छिणाऱ्या प्रवेश पात्र उमेदवार, तसेच परवाना असलेले पात्र उमेदवारांनी दि. 31 डिसेंबरपर्यंत अर्ज करावे, असे आवाहन आत्माच्या प्रकल्प संचालक अर्चना निस्ताने यांनी केले आहे.


## जाहीर नोटीस

**धर्मादाय सह आयुक्त कार्यालय,**
**अमरावती विभाग, अमरावती**

जा.क्र.धसआ/अधि/६७७५/२०२४ दिनांक १३/१२/२०२४

**अर्ज क्र. ०३४/कलम ३६ (१)(अ)/२०२४**
**बॉइज अॅण्ड गर्ल्स खिश्चन होम चांदूर बाजार ता. चांदूर बाजार जि. अमरावती**
**रजि नं. डि-११/ अमरावती**

वरील अर्जदाराने वरील नमूद न्यासाची नोंदणी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अमरावती येथे केलेली आहे. मौजे चांदूर बाजार जि. अमरावती येथील गावठाणा नं. १३२ मधील प्लॉट नं. ३१/१ याचा नगर परिषद मधील जुना मालमत्ता क्रमांक १२/११७ आताचा नवीन मालकत्ता क्रमांक १२०००१२६ चे संपूर्ण क्षेत्र फळ पुर्व पश्चिम ८४ फूट, दक्षिण उत्तार ३८ फूट = ३१९२ फुट त्यात ट्रेड सेंटर नावाने बांधलेली पक्की इमारत, त्यामध्ये १५१२ चौरस फूट तळ मजला व १५१२ पहिला मजला असे एकूण ३०२४ चौरस फुट बांधलेले बांधकाम हि मालमत्ता विकण्याची परवानगी मागितलेली आहे. त्याची चतु:सिमा ही खालील प्रमाणे –

१) पुर्वेस – जुनी लाकुड बाजाराची जागा आताचे डॉ. आंबेडकर व्यापारी संकुल
२) पश्चिमेस – रोड
३) उत्तरेस – श्री. मनोहरराव भेले यांची जागा
४) दक्षिणेस – मोर्शीला जाणारा रोड

त्या अर्थी या नोटीस द्वारे कळविण्यात येते की, जर सदहू मालमत्तेवरील विक्री बाबत कोणालाही काही आक्षेप असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाले च्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत मा. धर्मादाय सह आयुक्त अमरावती यांचे कार्यालयात जातीने किंवा मान्यता दिलेल्या प्रतिनिधी मार्फत किंवा योग्य रितीने सुचना दिलेल्या वकीलामार्फत खालील सही करणार यांचे समोर दिलेल्या पत्यावर दाखल करावे त्यानंतर आलेल्या कैफियतचा विचार केला जाणार नाही.

आज दिनांक १३/१२/२०२४ रोजी माझे सही व शिक्क्यानिशी व धर्मादाय सह आयुक्तांच्या शिक्क्यानिशी ही नोटीस दिली.

शिक्का

**प्र. अधिक्षक ( न्याय )**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती**


# अमरावती ते परतवाडा शेवटची एसटी बसफेरी अचलपुरात यावी!

## अचलपूर येथील नागरिकांची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर, ( दि.13 )-** दररोज येणारी रात्री दहा वाजता अमरावती येथून परतवाडा करता सुटणारी शेड्युल क्रमांक 87 शेवटची एसटी बस अचलपूरात यावी अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.

अमरावती ते परतवाडा रात्री 10 वाजता अमरावतीहून सुटणारी शेवटची एसटी बस मागील अनेक दिवसांपासून अचलपूर ला येणे बंद झाले आहे. पूर्वी ही एसटी बस नागपूरी गेट मार्गे अचलपूर ला येत होती. या लास्ट टाईम शेवटच्या एसटीमध्ये अचलपुरात मोठ्या प्रमाणे प्रवासी येतात. व्यापारी, विद्यार्थी, महिला प्रवासी दररोज अचलपूर ला येतात. मात्र ही शेवटची एसटी बस फेरी मागील अनेक दिवसांपासून अचलपुरात येणे बंद झाले असून, प्रवाशांना



चांदुर नाका किंवा अचलपूर नाका येथे उतरावे लागते. अमरावती येथून सुटणारी शेड्युल क्रमांक 87 ही शेवटची बस फेरी पुन्हा सुरू करण्याची मागणी करण्यात येत आहे. रात्रीला 11 ते 11.30 वाजता अंधारात उतरावे लागते. तेथून प्रवासांना अचलपूरात यायला मोठी गैरसोय होते. रात्री अकरानंतर अचलपुरात येण्याकरता ऑटो मिळत नाही. त्यामुळे रात्रीला अनेकांना अचलपुरात पायीच यावे लागते. एसटी महामंडळाने अमरावती येथून रात्री दहा वाजता सुटणारी शेवटची परतवाडा बस फेरी अचलपूर ला सुद्धा यावी जेणेकरून नागरिकांना त्रास सहन करावा लागणार नाही.

मी टायपिंग चा विद्यार्थी आहे. तसेच अमरावतीला सलून मध्ये हेअर कटिंग ट्रेनिंग घेत आहे. त्यामुळे शेवटच्या टायमिंगने अचलपूर येतो. शेवटचा टायमिंग अचलपुरात येणे गरजेचे आहे.

**प्रथमेश पुरबगोला, अचलपूर**

एसटी महामंडळाने अमरावती परतवाडा लास्ट टाईम अचलपुरात येणे पुन्हा सुरू करावे. जेणेकरून येथील प्रवाशांना सुविधा होईल.

**बंटी ककरानिया, अचलपूर**